**शेलूबाजार** : मंगरुळपीर तालुक्यातील हिरंगी येथे गुरुवारी रात्री संतोष सावके यांच्या घरात निघालेल्या २ फूट लांब अतिविषारी दुर्मिळ मण्यार सापासह पेडगाव येथील विलास दंदे यांच्या घरात निघालेल्या ५.५ फूट लांब विषारी नागाला श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य तथा सर्पमित्रांनी शिताफीने व सुरक्षिततरीत्या रेस्क्यू करून निसर्ग अधिवासात मुक्त केले.

मंगरुळपी तालुक्यातील पेडगाव येथील विलास दंदे यांच्या घरात निघालेल्या विषारी नागाला अनिकेत इंगळे व बुद्धभूषण सुर्वे यांनी, तर हिरंगी येथे संतोष सावके यांच्या घरात निघालेल्या मण्यार सापाला राहुल साखरे आणि अभिषेक ठाकरे यांनी शिताफीने व सुरक्षिततरीत्या पकडले. याबाबत त्यांनी वनविभागाला माहिती दिली व दोन्ही सापांना निसर्ग अधिवासात मुक्त केले.

Hello Washim
Page No. 4 Sep 03, 2022
Powered by: erelego.com

दिव्य मराठी यवतमाळ 15-09-2022

# वृद्धाचा मृतदेह काढला बाहेर

**वनोजा** | रिसोड तालुक्यातील हिवरा पेन येथे पैनगंगा नदीमध्ये सीताराम बाबुराव सरनाईक (८०) मंगळवारी सायंकाळी वाहून गेले होते. त्यांचा मृतदेह बुधवारी आढळून आला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजाद्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बापूराव डोंगरे यांना माहिती दिली. पथकाने घटनास्थळी जात सीताराम सरनाईक यांचा शोध घेतला. ५ तासांनंतर सरनाईक यांचा मृतदेह आढळून आला. प्रवीण गावंडे, ज्ञानेश्वर खडसे, सुमीत राठोड, पुनेश राठोड, अनिकेत इंगळे, अभिषेक ठाकरे, नामदेव डाळ, विलास नवघरे, चंदन गव्हाणे व गणेश शिंदे, रोशन लाभांडे आदींनी शोध घेतला.

देशोन्नती

# येडशी येथे आढळला ७ फुटाचा अजगर साप

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ येडशी येथील रहिवाशी कमलाबाई भगवानराव आरु यांच्या शेतातील सोयाबीन पिकामध्ये ७ फुट अजगर आढळल्याने अजगराला बघण्यासाठी नागरीकांनी एकच गर्दी केली.

येडशी हे गाव मंगरुळपीर तालुक्यातील असून गावाच्या बाजुला पुर येथे मोठे जंगल आहे. कदाचित जंगलामधून अजगर आला असावा असे वन्यप्रेमींना वाटते. दरम्यान सोयाबीनच्या शेतात महिला काम करित असतांना त्यांना १० सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान अजगर दिसला पोलीस पाटील गणेश बारड यांनी याबाबत साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या बचाव पथकाला ही माहिती दिली. पथकाचे सदस्य आदित्य इंगोले, शुभम हेकड, विलास नवघरे, प्रविण गावंडे आदींनी घटनास्थळी येऊन



अजगराला सुरक्षीत पकडले तसेच वनरक्षक अहिरे यांनी सर्पमित्र अमोल खंडारे तसेच पथकाचे सदस्य यांच्या मदतीने अजगराला नैसर्गिक अदिवासात सोडून जीवनदान दिले. जिल्ह्यातील डोंगराळ भागात अजगर सापडल्याच्या बऱ्याच घटना दिसत आहेत. अजगराने बकरी किंवा हरणीचे पिल्लू गिळल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत. शेतात अजगर दिसल्याने या परिसरातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. मात्र अजगर दिसण्याच्या ह्या घटना क्वचितच घडतात अशी माहिती सर्पमित्रांनी दिली. (जि.प्र.)

Deshonnati Edition
Sep 12, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

Tital Code : MAHMAR51049
FILE NO.1364943

दैनिक
# विदर्भ केसरी

Email Id : vidarbhkesari21@gmail. com
मुख्यसंपादक : अमोल कंटाळे

## गणेश विसर्जनावेळी अनुचित घटना टाळण्यासाठी रासेयो पथकाची कर्तव्यतत्परता

### जऊळका पोलिस स्टेशन व जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांचा पुढाकार.

**प्रमोद सावळे**
**मंगरूळपीर (ता. प्र.)**



गणेश विसर्जनाच्या कुठल्याही प्रकारची अनुचित घटना टाळण्यासाठी व गणेश विसर्जनात विघ्न टाळण्यासाठी वाशिम जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक मा. श्री. बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव तालुक्यातील जऊळका पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक मा. आदिनाथ मोरे यांनी श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ति व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांना पत्राद्वारे पाचारण केले. होते. यावेळी रासेयो संचालक डा ॅ. राजेश बुरंगे, निवासी उपजिल्हाधिकारी मा.श्री.शैलेश हिंगे, जिल्हा आपत्ति व्यवस्थापन अधिकारी मा. शाहु भगत, महाविद्यालयाचे प्राचार्य डा ॅ. देवेंद्र गावंडे व पथकाचे समन्वयक प्रा. बापुराव डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलिस अधीक्षक मा. बच्चन सिंह, मालेगाव तहसिल चे तहसिलदार रवी काळे,पोलिस निरीक्षक मा. आदिनाथ मोरे सर यांच्या सहकार्याने दोन दिवस मालेगाव तालुक्यातील जऊळका रेल्वे येथील काटेपूर्णा नदीच्या पुलावर तसेच किन्हीराजा येथे पथकाचे सदस्य सर्व सुरक्षा साहित्यांसोबत नियुक्त केले. गणेश विसर्जनावेळी अनेक धरण, तलाव व नदी नाल्यांमध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. याची खबरदारी म्हणून जऊळका पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक मा. आदिनाथ मोरे यांनी पथकाच्या सदस्यांना पाचारण करून ठिकठिकाणी सदस्य नियुक्ति केले. यामुळे कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडली नाही. पथकाचे सदस्य सकाळ पासुनच ठरवुन दिलेल्या पोलिस प्रशासनासोबत जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक व पोलिस निरीक्षक यांनी दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडत होते. यासोबतच अकोला जिल्ह्यातील मन नदीवर देखील सुरक्षेची खबरदारी म्हणून उपजिल्हाधिकारी मा. संजय खडसे सर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ति व्यवस्थापन अधिकारी मा. संदीप साबळे सर यांनी पत्राव्दारे पथकाच्या सदस्यांना पाचारण केले होते. यावेळी नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय अकोला चे तलाठी सुनिल कल्ले व हरिहर निमकंडे यांच्या सोबत मन नदीवर बोट व्दारे दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडली.यावेळी स्वत अकोला जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. संजय खडसे सर हे देखील या आ ॅपरेशन मध्ये सहभागी झाले होते. या सोबत च पथकाचे १५ सदस्य सहभागी झाले होते. तसेच जऊळका पोलिस चे सर्व पोलिस अधिकारी कर्मचारी व अकोला जिल्हाधिकारी कार्यालयाचे कर्मचारी यावेळी उपस्थित होते.एकुनच पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, पथकाचे समन्वयक आणि सदस्यांच्या समन्वयाने वरील विसर्जन कार्यक्रम शांततेत पार पडला.

---

लोकमत

## बचाव पथकामुळे वाचले गाईचे प्राण

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम : मंगरूळपीर तालुक्यातील पांगरी या गावानजीक समृद्धी महामार्गावरील डिव्हाईडरमध्ये तीन दिवसांपासून एक गाय अडकल्याने तिचा जीव धोक्यात आला होता. साळुंकाबाई राऊत महाविद्यायातील रासेयो पथकाने या गाईला मुक्त करून तिचे प्राण वाचविले.

पांगरी या गावानजीक समृद्धी महामार्गावरील डिव्हाईडरमध्ये तीन दिवसांपासून एक गाय अडकून पडली होती. तिला त्या डिव्हाईडरमधून बाहेर पडता येत नव्हते. ही माहिती अमोल दंदे यांनी ३ तारखेला सकाळी ९ वाजता श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाला दिली. त्यावेळी पथकाच्या सदस्यांनी क्षणाचाही विलंब न करता क्रेनसह घटनास्थळी दाखल झाले व अडकून पडलेल्या गाईला क्रेनच्या साहाय्याने डिव्हाईडरमधून बाहेर काढले.

यावेळी पथकाचे सदस्य अनिकेत इंगळे, बुद्धभूषण सुर्वे, अमोल दंदे हे होते.

# रासेयोच्या निसर्ग प्रेमींनी केले मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वनोजा** ▪ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा येथील एनसीसी च्या विद्यार्थ्यांची आज काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे वन भ्रमंती आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य आदित्य इंगोले, सचिन राठोड यांनी विद्यार्थ्यांना निर्सगा बद्दल पर्यावरणाबद्दल इस्तंभुत माहिती दिली.

११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अकोला, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे व काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या वन भ्रमंती चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचा आदित्य इंगोले व वनविभागाचे गाईड दत्ता शेलकर यांनी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट च्या विद्यार्थांना काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य तसेच विविध फुलपाखरे, कोळी, वृक्ष, आयुर्वेदिक औषधी वनस्पती, वन्यजीव पक्षी यांच्या बद्दल विस्तृत माहिती देऊन त्यांचे निसर्गात असलेले महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विद्यार्थांना विविध फुलपाखरांच्या जाती, पक्षी, वन्यजीव, वनौषधी यांच्या ओळख होऊन त्याबद्दल माहिती मिळाली. यावेळी विद्यार्थांना विविध पक्षी, फुलपाखरे, कोळी, वन्यजीव यांचे दर्शन देखील झाले. यावेळी निसर्ग सृष्टी अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन निसर्ग रक्षणासोबतच संवर्धनात हातभार लावावा असे आवाहन निसर्ग प्रेमींनी केले. एनसीसी कॅडेटनी त्यांच्या मनात असलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. यावेळी सचिन राणे, सचिन राठोड यांनी देखील विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला लेफ्टनंट डॉ.सुनिल बोरचाटे,वनरक्षक निलेश खोडके, रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे प्रथम सिंकटवार,नयन राठोड, वनविभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी एनसीसी चे ३५ कॅडेट नी या वन भ्रमंती मध्ये सहभाग नोंदवला होता.(वार्ता.)

देशोन्नती

# जंगला लगतच्या गावांमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त जनजागृती

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वनोजा** ▪ वाशिम-अकोला जिल्ह्यात पसरलेले असलेल्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे १ ऑक्टोबर पासुन मोठ्या उत्साहात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या मध्ये विविध कार्यक्रमांची रेलचेल आहे. . ५ ऑक्टोबर ला जंगला लगतच्या गावांमध्ये काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य वन्यजीव विभाग अकोला व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा यांच्या संयुक्त विद्यमाने पथनाट्याच्या माध्यमातून आगळीवेगळी जनजागृती केली.

या पथनाट्याच्या माध्यमातून वन्यजीव सप्ताह का साजरा केला जातो, वन्यप्राण्यांकडुन मानवावर, पाळीव जनावरे यांच्या वर होणारे हल्ले व त्याची मिळणारी नुकसान भरपाई,अवैध वृक्षतोड चराईबंदी, कुर्हाडबंदी, अवैध शिकार,वनवनवा व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मानव-वन्यजीव संघर्ष या विषयावर माहिती देऊन उत्कृष्ट असे पथनाट्य जंगला जवळच्या भुर, कासमार येथे सादर करून विशेष व आगळीवेगळी जनजागृती करण्यात आली. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताहानिमित्त राबविण्यात आला. यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनरक्षक अविनाश वानखडे, निलेश खोडके, करवाळे यांच्या सह रवी बेटकर, रामा लोनकर, प्रमोद खुले, प्रविण तपसी,नागसेन आकोडे आदि कर्मचारी व विध्यार्थी विलास नवघरे, सम्यक अवचार, चंदन नवघरे, नयन राठोड, आकाश सावरे आदित्य इंगोले यांची उपस्थित होती. (वार्ता.)

Tital Code : MAHMAR51049

दैनिक

# विदर्भ केसरी

Email Id : vidarbhkesari21@gmail. com

मुख्यसंपादक : अमोल कंटाळे

# नदीत वाहून गेलेल्या वृद्धाचा मृतदेह काढला बाहेर..



## रासेयो पथकाचे धाडसी कार्य..

**प्रमोद सावळे**
**मंगरुळपीर (ता. प्र.)**

-----------------------------------

काल संध्याकाळी ५ वाजता रिसोड तालुक्यातील हिवरा पेन येथे पैनगंगा नदीमध्ये सीताराम बाबुराव सरनाईक वय (८० वर्ष अंदाजे ) वाहुन गेले अशी माहिती वाशिम जिल्ह्याचे जिल्हा आपत्ति व्यवस्थापन अधिकारी मा. श्री. शाहु भगत सर तसेच रिसोड चे कर्तव्यदक्ष तहसीलदार मा. श्री. अजित शेलार सर यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ति व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बापुराव डोंगरे यांना दिली. यानंतर प्रा. डोंगरे यांनी संबंधित माहिती पथकाचे अध्यक्ष व प्राचार्य डा ॅ. देवेंद्र गावंडे यांना दिली. व वाशिम जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. शैलेश हिंगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाच्या सदस्यांना सर्व सुरक्षा साहित्यांसोबत हिवरा पेन येथे सकाळी च रवाना केले. व सर्च आ ॅपरेशन ला सुरूवात केली, ३ तासाच्या सलग सर्च आ ॅपरेशन नंतर सुध्दा मृतदेह आढळून आला नाही. फक्त त्यांची टोपी व काठी आढळून आली. यावेळी रिसोड चे तहसिलदार श्री. अजित शेलार यांनी देखील घटनास्थळी भेट देऊन सर्च आ ॅपरेशन चा आढावा घेतला. यानंतर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मा. श्री. शाहु भगत व प्रा. बापूराव डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पेशल सर्च आ ॅपरेशन राबविले व तब्बल ५ तासानंतर सदर ठिकाणापासून ७ किमी अंतरावर सदर वृद्धाचा मृतदेह एका खडकाला नदीच्या मधात आढळून आला. पथकाच्या सदस्यांनी सदर मृतदेह बाहेर काढून प्रशासनाच्या व कुटुंबाच्या ताब्यात दिला.

यावेळी पथकाचे प्रविण गावंडे, ज्ञानेश्वर खडसे, सुमित राठोड, पुनेश राठोड, अनिकेत इंगळे, अभिषेक ठाकरे, नामदेव डाळ, विलास नवघरे, चंदन गव्हाने व गणेश शिंदे ( चालक) व रोशन लांभाडे आदि सदस्य यांच्या मदतीने सर्च आ ॅपरेशन राबविण्यात आले. तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी दिपक गोटे तसेच गावकर्यांची यावेळी उपस्थिती होती.

दैनिक
# विदर्भ केसरी
मुख्यसंपादक : अमोल कंटाळे



# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वृद्धांसोबत पोषण महिना साजरा.

**प्रमोद सावळे**
**मंगरुळपीर (ता. प्र.)**

---

वनोजा येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा च्या राष्ट्रीय सेवा योजना कडुन आज येडशी येथील कौसल्यादेवी वृध्दाश्रमात विविध उपक्रम साजरे करण्यात आले . संगाबाअवि रासेयोचे संचालक डा ॅ. राजेश बुरंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डा ॅ. देवेंद्र गावंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.बापुराव डोंगरे,महिला कार्यक्रम अधिकारी डा ॅ. ममता पाथ्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो स्वयंसेवकांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त येडशी येथील वृध्दाश्रमात विविध उपक्रम राबविले यामध्ये वृध्दांच्या हस्ते वृक्षारोपण, तसेच त्यांना फळे अल्पोपहाराचे वाटप केले. यासोबतच वृध्दाश्रमातील परिसराची स्वच्छता करून तेथील वृद्धांसोबत हितगुज केली. त्यांच्या हस्ते केक कापून आनंदोत्सव साजरा केला. हे पाहुन तेथील वृध्दांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. रासेयो स्वयंसेवकांनी व आपत्ती व्यवस्थापन सदस्यांनी पोषण सप्ताहानिमित्त राबवलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे वृद्धांमध्ये व स्वयंसेवकांमध्ये आपलेपणाची जाणीव निर्माण झाली .या कार्यक्रमाला वृद्धाश्रमाचे संचालक, रासेयो स्वयंसेवक व आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य उपस्थित होते.

लोकमत

# नदीच्या पुरात वृद्ध गेला वाहून, शोधकार्य सुरु!

लोकमत न्यूज नेटवर्क

**रिसोड** : तालुक्यातील पैनगंगा नदीला आलेल्या पुरात एक वृद्ध वाहून गेल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली.

हिवरा पेन येथे नदीमध्ये एक वयोवृद्ध बुडाल्याची माहिती वाशिम जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, तसेच रिसोडचे



तहसीलदार अजित शेलार यांनी श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजा येथील रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बापूराव डोंगरे यांना दिली. यानंतर प्रा. डोंगरे यांनी पथकाचे अध्यक्ष व प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे वाशिम निवासी उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाच्या सदस्यांना सर्व सुरक्षा साहित्यांसोबत हिवरा पेन येथे सकाळीच रवाना केले. पथकाचे प्रवीण गावंडे, ज्ञानेश्वर खडसे, सुमित राठोड, पुनेश राठोड, अनिकेत इंगळे, अभिषेक ठाकरे, नामदेव डाळ, विलास नवघरे, चंदन गव्हाने व गणेश शिंदे आदी सदस्य घटनास्थळी दाखल झाले असून सर्च ऑपरेशनला सुरुवात करण्यात आली आहे.

Hello Washim
Page No. 4 Sep 15, 2022
Powered by: erelego.com

दिव्य मराठी
यवतमाळ 11-09-2022

# सात फुट लांब अजगराला दिले जीवदान

## साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या आपत्ति व्यवस्थापन पथकाची कामगिरी

प्रतिनिधी | वनोजा

आज सकाळी ११ वाजता येडशी येथे तुकाराम पाटील यांच्या शेतात मजुर काडीकचरा कापण्याचे काम करीत असताना सोयाबीन मध्ये त्यांना एक भला मोठा साप आढळुन आला.

यावेळी सदर घटनेची माहिती पोलिस पाटील गणेश बारड यांनी श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा आपत्ति व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्य आदित्य इंगोले यांना दिली. सदर घटनेची माहिती मिळताच समन्वयक प्रा. बापुराव डोंगरे यांना माहिती देऊन पथकाचे सदस्य आदित्य इंगोले, शुभम हेकड, प्रविण गावंडे, व विलास नवघरे घटनास्थळी दाखल झाले. पाहणी केली असता सोयाबीन मध्ये अंदाजे ७ फुट लांबीचा अजगर त्यांना आढळून आला. यावेळी पथकाच्या सदस्यांनी सदर अतिशय तापट अजगर सुरक्षित रित्या



रेस्क्यू केला. सदर घटनेची माहिती वनरक्षक अहिरे यांना दिली. व त्यांच्या उपस्थित मध्ये कंझरा येथील सर्पमित्र अमोल खंडारे तसेच पथकाचे सदस्य शुभम हेकड, प्रविण गावंडे यांनी सदर अजगराला निसर्ग अधिवासात सोडत जीवदान दिले.

देशोन्नती

# जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी केली अपघात स्थळाची पाहणी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेलुबाजा** ■ जिल्ह्यात वाढते अपघाताची कारणे व त्यावर उपाययोजना यासाठी आज शेलूबाजार येथील पोलीस चौकीत जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चनसिंह यांनी स्वतः अपघातप्रवण स्थळ तसेच धोक्कादायक वळण यांची पाहणी केली.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे, परिवहन विभागाचे मोटार वाहन निरिक्षक सुजय पगार, सौरभ सोयगांवकर, मंगरूळपीर पोलिस स्टेशन पोलिस निरीक्षक सुनिल हूड, शेलुबाजार पोलिस चौकीच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मंजुषा मोरे, जऊळका पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आदिनाथ मोरे तसेच पोलिस विभागातील पोलिस अधिकारी यांची उपस्थिती होती.




संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती सालुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा राष्ट्रीय सेवा योजना च्या आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बाबुराव डोंगरे, पथकाचे सदस्य नयन राठोड, प्रथम सिंकटवार , राहुल साखरे, प्रवीण गावंडे व आदित्य इंगोले आदी उपस्थित होते. यावेळी त्यांनी वाढत्या अपघाताची कारणे व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती घेतली. व या संदर्भात शेलुबाजार येथे विशेष बैठक देखील घेतली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना च्या आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक करित असलेल्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंह यांनी येथील चौक तसेच परिसरातील अपघातस्थळा ची पाहणी केली त्यानंतर आयोजीत बैठकीत धोक्याच्या वळणावर दिशा दर्शक फलक लावणे, तालुक्यातील विविध गर्दीच्या ठिकाणी नो पार्किंग झोन तयार करणे, आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसविण्या संदर्भात पत्रकारांसोबत चर्चा करून संबधीत खात्याकडून ठरल्या प्रमाणे सुधारणा करण्या बाबत पाठपुरावा करणार असल्याचे सांगीतले त्याच बरोबर परिसरातील अपघातस्थळा बाबत माहीती जाणून घेतली.

Deshonnati Edition
Oct 15, 2022 Page No. 8
Powered by : eReleGo.com

विदर्भ केसरी

# शेलूबाजार येथे वाढते रस्ते व अपघाताची कारणे उपाययोजना बद्दल विशेष बैठक.

प्रमोद सावळे
/मंगरुळपीर (ता. प्र.)
--------------------------------



वाशिम जिल्ह्यात वाढते अपघाताची कारणे व त्यावर उपाययोजना यासाठी आज शेलुबाजार येथे वाशिम जिल्ह्याचे सन्माननिय पोलिस अधीक्षक मा. श्री. बच्चन सिंह सर ( भा. पो. से.) यांनी स्वतः अपघातप्रवण स्थळ तसेच धोकादायक वळणे यांची पाहणी केली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. यशंवत केडगे, परिवहन विभागातील अधिकारी, मंगरूळपीर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक, शेलुबाजार पोलिस चौकी च्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मंजुषा मोरे, जऊळका पोलिस स्टेशन चे सहाय्यक सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ मोरे तसेच पोलिस विभागातील पोलिस अधिकारी यांची उपस्थिती होती.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा राष्ट्रीय सेवा योजना च्या आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बाबुराव डोंगरे, पथकाचे सदस्य नयन राठोड, प्रथम सिंकटवार , राहुल साखरे, प्रवीण गावंडे व आदित्य इंगोले आदी उपस्थित होते. यावेळी त्यांनी वाढत्या अपघाताची कारणे व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती घेतली. व या संदर्भात शेलुबाजार येथे विशेष बैठक देखील घेतली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना च्या आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक करित असलेल्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले.

देशोन्नती

# अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी महिलेला रासेयो पथकाचा मदतीचा हात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेलूबाजार** ■ वाशिम ते शेलुबाजार रोडवरील पिंप्री खुर्द फाट्या नजीक अज्ञात वाहनाच्या धडकेत एक महिला जखमी झाल्याची माहिती रासेयो पथकाचे सदस्य राहुल साखरे यांना मिळताच त्यांनी पेपरला न जाता सदर महिलेला उपचाराकरिता आरोग्य केंद्रात रवाना करून मदतीचा हात दिला.



वाशिम रस्त्यावरील पिंपरी खुर्द फाट्या नजीक अज्ञात वाहनाच्या धडकेत एक महिला जखमी अवस्थेत पडली असल्याची माहिती रासेयो पथकाचे सहकारी सत्यम अवगण यांनी श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य राहुल साखरे यांना दिली. माहिती मिळताच पथकाचे सदस्य राहुल साखरे यांनी पेपरला न जाता सहकार्या सोबत तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी सदर अपघात हा रात्री झालेला होता अशी माहिती मिळाली;या अपघातात त्या महिलेच्या उजव्या हाताला जखम होती व संपूर्ण शरीराला मुक्का मार लागलेला होता. ही सर्व माहिती राहुल साखरे यांनी ११२ ला देऊन १०८ ला पाचारण केले. परंतु १०८ ला येण्यास विलंब होत होता व कोणतेही खाजगी वाहन मदतीकरिता थांबत नव्हते या वेळी रुग्णसेवा युवा ग्रुप चे अध्यक्ष शिवा सावके यांनी पथकाच्या माहीती वरून जखमींच्या मदातिकरिता ज्ञानेश्वर सुर्वे (पिंपरी,सुर्वे) यांचे खाजगी वाहन उपलब्ध करून दिले.

त्यानंतर जखमी महिलेला उपचाराकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र शेलुबाजार येथे आणले प्रथमोपचार करून पुढील उपचाराकरिता १०८ च्या साहाय्याने वाशिम येथे हलविण्यात आले. तेव्हा त्या महीले सोबत कोणीही नव्हते तर पथकाचे सदस्य प्रथम सींकटवार, नयन राठोड हे त्या महिले सोबत गेले या वेळी पोलिस चौकी शेलुबाजार येथील पोलीस शिपाई गोपाल कव्हर पथकाचे राहुल साखरे , पथकाचे सहकारी गोपाल कुटे, गोपाल लांभाडे , विशाल राऊत आदींनी अपघातग्रस्त महिलेला आरोग्य केंद्रापर्यंत पोहचवून मदतीचा हात दिला. (वार्ता.)

Deshonnati Edition
Oct 13, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

लोकमत

न्यूज Inbox

# विहिरीत पडलेल्या नीलगायीला जीवदान

**वाशिम :** पिंपरी सुर्वे येथील बाळकृष्ण सुर्वे यांच्या शेतातील १५ फूट खोल विहिरीत शुक्रवारी नीलगाय पडली होती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांनी कारंजा-मंगरूळपीर वनपरिक्षेत्राचे वनाधिकारी अमित शिंदे आणि कासोळा बिटच्या अंजली घटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विहिरीतील गाळात फसलेल्या निल गायीला स्थानिक नागरिक व वनविभागाच्या चमूने बाहेर काढून निसर्ग अधिवासात मुक्त केले.

लोकमत

न्यूज Inbox

## विहिरीत पडलेल्या नीलगायीला जीवदान

**वाशिम :** पिंपरी सुर्वे येथील बाळकृष्ण सुर्वे यांच्या शेतातील १५ फूट खोल विहिरीत शुक्रवारी नीलगाय पडली होती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांनी कारंजा-मंगरुळपीर वनपरिक्षेत्राचे वनाधिकारी अमित शिंदे आणि कासोळा बिटच्या अंजली घटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विहिरीतील गाळात फसलेल्या निल गायीला स्थानिक नागरिक व वनविभागाच्या चमूने बाहेर काढून निसर्ग अधिवासात मुक्त केले.

देशोन्नती

# क्रुझरची झाडाला धडक चालक जखमी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेलूबाजार** ■ वनोजा येथून ४ किमी अंतरावर असलेल्या माळशेलु नजीक क्रुझरची झाडाला धडक होऊन चालक जखमी झाल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी घडली. यावेळी रासेयो पथकाच्या सदस्ययांनी जखमीला उपचाराकरिता रुग्णालयात हलविले.

माळशेलू नजीक क्रुझर एमएच ३७ जी ८५६८ या गाडीची थेट झाडाला धडक दिल्याने या अपघातात चालक अनिल भगत वय २८ वर्ष रा. उजळेश्वर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. सदर घटनेची माहिती वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक यांना मिळताच पथकाचे सदस्य व सचिन



झाले. व १०८ रूग्णवाहिकेला पाचारण केले.यावेळी रूग्णवाहिकेला येण्यास विलंब होत असल्याने वनोजा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा नितीन धोटे यांना संपर्क करून वनोजा प्राथमिक आरोग्य केंद्राची रूग्णवाहिका उपलब्ध करून घेतली.

आरोग्य केंद्रात आणले. येथे प्रथमोपचार करून १०८ रूग्णवाहिके व्दारे पुढिल उपचारासाठी अकोला येथील शासकीय रुग्णालयात हलविले. सचिन राणे व रासेयो पथकाचे सदस्य यांनी वेळीच दाखविलेल्या तत्परतेमुळे सदर जखमी ला योग्य मदत मिळाली.

Deshonnati Edition
Oct 23, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

लोकमत

# साडेपाच फुटाच्या कोब्राला जीवदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** मंगरुळपीर तालुक्यातील शेलूबाजारपासून नजिकच असलेल्या तपोवन येथे रविवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास गोरख येवले यांच्या घरात एक साडे पाचफूट लांबीचा नाग शिरला. ही माहिती मिळताच साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकातील सर्पमित्र सदस्यांनी त्याला सुरक्षितपणे पकडून जंगलात सोडले.

तपोवन येथील गोरख येवले यांच्या घरात तब्बल साडेपाच फूट लांबीचा नाग शिरला. घरच्या मंडळींना हा नाग दिसल्यानंतर त्यांची घाबरगुंडी उडाली. ही माहिती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य अनिकेत इंगळे व बुद्धभूषण सुर्वे यांना मिळाल्यानंतर त्यांनी अतिशय शिताफीने व सुरक्षितरीत्या त्या नागाला पकडत वनविभागाला कळवून सापाला जंगलात सोडले. गत तीन दिवसात या पथकाने विषारी व निमविषारी व बिनविषारी मिळून १२ सापांना जीवदान दिले आहे.

Hello Washim
Page No. 3 Oct 03, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# वन्यजीव सप्ताह: पहिल्याच दिवशी सात सापांना जीवदान

## तीन नागांचा समावेश: वनोजाच्या वन्यजीव प्रेमींची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम:** राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या वन्यजीव प्रेमींनी चार नागांसह एकूण सात सापांना जीवदान दिल्याची कामगिरी केली. वनविभागाकडून १ ऑक्टोबरपासून वन्यजीव सप्ताह साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

या सप्ताहांतर्गत शाळा, महाविद्यालये, वन परिक्षेत्रालगतच्या गावांत वन्य प्राण्यांचे संरक्षण व संवर्धन याबाबत जनजागृती करण्यासह जैवविविधेतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांचाही सहभाग आहे. या पथकातील सदस्यांनी शनिवार, १ ऑक्टोबर रोजी वन्यजीव सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी विविध ठिकाणी आढळलेल्या चार नागांसह सात सापांना सुरक्षित पकडून वनविभागाच्या मार्गदर्शनात जंगलात सोडून जीवदान दिले. यात एक धूळ नागीन आणि धामण सापांचाही समावेश होता.

अनिकेत इंगळे, बुद्ध भूषण सुर्वे, राहुल साखरे, अभिषेक ठाकरे आणि आदित्य इंगोले यांनी हे साप पकडले.



### कासवालाही दिले जीवदान

वाशिम : पेडगावनजीक समृद्धी महामार्गावरील पीएनसी कॅम्पजवळच्या तलावातून बाहेर पडत रस्त्यावर आलेल्या एका कासवाला साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने जीवदान दिले. समृद्धी महामार्गावरील पीएनसी कॅम्पजवळच्या तलावातून बाहेर पडत एक कासव रस्त्यावर आले होते. तेथील कर्मचाऱ्यांनी ही माहिती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांना दिली. त्यावरून अनिकेत इंगळे व बुद्धभूषण सुर्वे घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी त्या कासवाला ताब्यात घेत वनविभागाला कळवून निसर्ग अधिवासात मुक्त केले.

### पेडगावातच आढळले तीन कोब्रा

वन्यजीव सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी नागपूर-औरंगाबाद महामार्गावर पेडगाव या गाव परिसरातच तीन विषारी नाग आढळून आले. त्यात वैभव सुर्वे यांच्या घरात ४ फुट लांबीचा, बाळाभाऊ इंगोले यांच्या ढाब्यावर ५ फुट लांबीचा, तर पेडगाव येथीलच प्रविण जाधव यांच्या घरात आढळोल्या ४ फुट लांबीच्या नागाचा समावेश होतो.

लोकमत

# वन्यजीव सप्ताह: पहिल्याच दिवशी सात सापांना जीवदान

## तीन नागांचा समावेश: वनोजाच्या वन्यजीव प्रेमींची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम:** राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या वन्यजीव प्रेमींनी चार नागांसह एकूण सात सापांना जीवदान दिल्याची कामगिरी केली. वनविभागाकडून १ ऑक्टोबरपासून वन्यजीव सप्ताह साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

या सप्ताहांतर्गत शाळा, महाविद्यालये, वन परिक्षेत्रालगतच्या गावांत वन्य प्राण्यांचे सरंक्षण व संवर्धन याबाबत जनजागृती करण्यासह जैवविविधेतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती



व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांचाही सहभाग आहे. या पथकातील सदस्यांनी शनिवार, १ ऑक्टोबर रोजी वन्यजीव सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी विविध ठिकाणी आढळलेल्या चार नागांसह सात सापांना सुरक्षित पकडून वनविभागाच्या मार्गदर्शनात जंगलात सोडून जीवदान दिले. यात एक धूळ नागीन आणि धामण सापांचाही समावेश होता.

अनिकेत इंगळे, बुद्ध भूषण सुर्वे, राहुल साखरे, अभिषेक ठाकरे आणि आदित्य इंगोले यांनी हे साप पकडले.

### कासवालाही दिले जीवदान

वाशिम : पेडगावनजीक समृद्धी महामार्गावरील पीएनसी कॅम्पजवळच्या तलावातून बाहेर पडत रस्त्यावर आलेल्या एका कासवाला साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने जीवदान दिले. समृद्धी महामार्गावरील पीएनसी कॅम्पजवळच्या तलावातून बाहेर पडत एक कासव रस्त्यावर आले होते. तेथील कर्मचाऱ्यांनी ही माहिती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांना दिली. त्यावरून अनिकेत इंगळे व बुद्धभूषण सुर्वे घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी त्या कासवाला ताब्यात घेत वनविभागाला कळवून निसर्ग अधिवासात मुक्त केले.

### पेडगावातच आढळले तीन कोब्रा

वन्यजीव सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी नागपूर-औरंगाबाद महामार्गावर पेडगाव या गाव परिसरातच तीन विषारी नाग आढळून आले. त्यात वैभव सुर्वे यांच्या घरात ४ फुट लांबीचा, बाळाभाऊ इंगोले यांच्या ढाब्यावर ५ फुट लांबीचा, तर पेडगाव येथीलच प्रविण जाधव यांच्या घरात आढळोल्या ४ फुट लांबीच्या नागाचा समावेश होतो.

Hello Washim
Page No. 3 Oct 02, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# क्रूझरची झाडाला धडक, चालक जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**शेलूबाजार :** क्रूझर वाहनाची झाडाला धडक लागून घडलेल्या अपघातात चालक गंभीर जखमी झाला. ही घटना वनोजा येथून ४ किमी अंतरावर असलेल्या माळशेलूनजीक घडली. अनिल भगत (वय २८) असे अपघातातील गंभीर जखमीचे नाव असून, तो अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील उजळेश्वर येथील रहिवासी असल्याचे कळले आहे.



माळशेलूनजीक एमएच ३७ जी ८५६८ क्रमांकाचे क्रूझर वाहन थेट झाडाला धडकल्याने घडलेल्या अपघातात चालक गंभीर जखमी झाल्याची माहिती वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाला मिळाली. त्यावरून पथकाचे सदस्य व सचिन राणे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी १०८ रुग्णवाहिकेला पाचारण केले. रुग्णवाहिकेला येण्यास विलंब होत असल्याने वनोजा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा नितीन धोटे यांना संपर्क करून वनोजा प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका उपलब्ध करून घेतली व जखमीला वनोजा प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. येथे प्रथमोपचार करून १०८ रुग्णवाहिकेद्वारे पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय रुग्णालयात हलविले. सचिन राणे व रासेयो पथकाचे सदस्य यांनी वेळीच दाखविलेल्या तत्परतेमुळे जखमीला योग्य मदत मिळाली.

Hello Washim
Page No. 3 Oct 23, 2022
Powered by: erelego.com

लोकमत



# जंगललगतच्या गावांमध्ये वन्यजीव सप्ताह

लोकमत न्यूज नेटवर्क

**वनोजा** : वाशिम-अकोला जिल्ह्यात पसरलेले असलेल्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे १ ऑक्टोबरपासून मोठ्या उत्साहात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यामध्ये विविध कार्यक्रमांची रेलचेल आहे. ५ ऑक्टोबरला जंगला लगतच्या गावांमध्ये काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य वन्यजीव विभाग अकोला व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजाव्दारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा यांच्या संयुक्त विद्यमाने पथनाट्याच्या माध्यमातून आगळीवेगळी जनजागृती केली.

यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चेहऱ्यावर वाघ, अस्वल, बिबटचे मुखवटे रंगवून त्यांच्या रक्षणासोबतच संवर्धनाचा संदेश दिला. हे मुखवटे सर्व गावकऱ्यांना आकर्षित करत होते. यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यचे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा आगळावेगळा उपक्रम वन्यजीव सप्ताहानिमित्त राबविण्यात आला. यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यचे वनरक्षक अविनाश वानखडे, नीलेश खोडके, करवाळे यांच्यासह रवी बेटकर, रामा लोनकर, प्रमोद खुले, प्रवीण तपसी,नागसेन आकोडे आदि कर्मचारी व विध्यार्थी विलास नवघरे, सम्यक अवचार, चंदन नवघरे, नयन राठोड, आकाश सावरे आदित्य इंगोले यांची उपस्थित होती.

Hello Washim
Page No. 4 Oct 08, 2022
Powered by: erelego.com

# हिमाचल प्रदेश मध्ये वनोजा येथील विद्यार्थी झळकले

## ♦ रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने सादर केले चित्तथरारक प्रात्यक्षिक

प्रतिनिधी | ९ डिसेंबर

**अकोला :** १५ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान हिमाचल प्रदेश येथील मनाली येथे राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथुन ६ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय साहसी शिबिर करिता महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली होती. यामध्ये वाशिम जिल्ह्यातील श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे प्रविण गावंडे व आदित्य इंगोले यांची निवड संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिलीप मालखेडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी केली होती. या



दोघांनी राष्ट्रीय स्तरावर सन्माननीय कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे,रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे व कार्यक्रम अधिकारी प्रा. बापुराव डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली मनाली येथील अटल बिहारी वाजपेयी माऊंटनीग अॅन्ड अलाईड स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट येथे उत्कृष्ट सादरीकरण केले. प्रत्येक साहसी प्रकारात सर्वात पुढे राहुन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ महाविद्यालय व महाराष्ट्र राज्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकवले.

# दुचाकीची समोरासमोर धडक

देशोन्नती वृत्तसंकलन...

## २ जण गंभीर व १ किरकोळ जखमी

**मंगरुळपीर** ■ अकोला-मंगरूळपीर महामार्गावरील वनोजा फाट्यावर दोन दुचाकींची समोरासमोर जबर धडक झाली. यामध्ये दोन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. श्प् ३७ ०६११ व श्प् ३७ ७१४० या दोन दुचाकी ची समोरासमोर धडक झाली. यामध्ये येडशी येथील मोबी पवार वय ५५ वर्ष यासोबतच तानाजी खनागळी ( करमाळा ता.जि.सोलापूर व सुनिल जाधव सोंडा ता. वाशिम) हे ३ जण जखमी झाले. यावेळी जखमींना हाताला व डोक्याला तसेच पाठीला गंभीर दुखापत झाली.व जास्त रक्तस्राव देखील भरपूर झाला.सदर घटनेची माहिती वनोजा येथील स्थानिकांना मिळताच ते तत्काळ मदतीसाठी धावले. तसेच साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो च्या आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांना पाचारण केले. सदर घटनेची माहिती ११२ ला देऊन तत्काळ १०८ रुग्णवाहिके ला पाचारण केले. व क्षणाचा हि विलंब न करता यावेळी शेलुबाजार आरोग्यवर्धिनी केंद्रतील १०८ रूग्णविहेकेचे चे चालक चंद्रकांत मुखमाले व डॉ. मिलन चव्हाण तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी स्थानिक नागरिक व पथकाच्या सदस्य व रूग्नवाहिकेचे कर्मचारी यांच्या मदतीने जखमींना रूग्नवाहिकेत उचलून तत्काळ अकोला येथे उपचारासाठी हलविले. (ता.प्र.)

**दिव्य मराठी** यवतमाळ 27-05-2023

# समृद्धी महामार्गावर भरधाव चारचाकी वाहनाची नीलगाईला धडक; तीन जखमी

**प्रतिनिधी** | मंगरुळपीर

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर एम. एच. ४८ ए. के. ४३४० या क्रमांकाच्या चारचाकी गाडीने नागपूरकडून संभाजीनगरकडे जाताना गुरुवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास वाशीम जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्यात महामार्गावर एका नीलगाईला धडक दिली. यामध्ये चारचाकी गाडीतील तीन जण गंभीर जखमी झाले. तसेच नीलगायीच्या दोन पायाला गंभीर दुखापत झाली व एक शिंग तुटले.

अपघातामधील जखमी रुग्णांना महामार्गावरील यंत्रणेने तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल केले. मात्र, जखमी नीलगाय रात्रीपासून समृद्धी महामार्गावर जखमी अवस्थेत विव्हळत होती. वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी व साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाचे आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य रात्री घटनास्थळी दाखल झाले. परंतु जखमी नीलगाईला उपचारासाठी नेण्यासाठी सकाळी नऊ वाजेपर्यंत कुठल्याही प्रकारची



सुविधा उपलब्ध उपलब्ध झाली नाही. सकाळी नऊ वाजता क्रेनच्या सहाय्याने नीलगायीला उचलून ट्रकमध्ये कारंजा येथील वन पर्यटन केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले.

स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा वाशीम जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्यामधून गेला आहे. अभयारण्यातील वन्य प्राण्यांना धोका नको म्हणून अभयारण्यामधून जाणाऱ्या महामार्गावर ओव्हारपास व अंडरपास आहेत. मात्र उर्वरित ठिकाणी रस्त्याच्या कडेला संरक्षण भिंत उभारली आहे. मात्र अनेक ठिकाणी या संरक्षण भिंती खुल्या आहेत. त्यामधून हे वन्य प्राणी महामार्गावर ये-जा करत असल्याचे बोलले जात आहे.

समृद्धी महामार्गावर अपघात घडल्यास जखमींना तत्काळ रुग्णवाहिका व इतर सुविधा मिळताना दिसून येतात. मात्र, मुक्या प्राण्यांचा अपघात झाल्यास त्यांना वन विभाग किंवा रुग्णालयात दाखल करण्याची कोणतीच सुविधा नाही. समृद्धीच्या चेक पोस्ट वरून मदतीसाठी आलेल्या वाहनांना प्रवेश नाकारला जातो. वन्य प्राण्यांचा अपघात घडल्यास वन विभागाकडे बोट दाखवून हात झटकले जातात. यामध्ये निरपराध वन्य प्राण्यांना प्राणास मुकावे लागत असून, आवश्यक त्या उपाय योजना करण्याची मागणी वन्यप्रेमी मधून होत आहे.

समृद्धी महामार्गावर प्राण्यांचा अपघात होताच त्यांना प्रथमोपचार किंवा सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याकरता कुठल्याही प्रकारची यंत्रणा दिसून आली नाही. जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष घालावे. वाशीम जिल्ह्यात अपघाताची संख्या मोठी आहे. त्यात रुसो टीमच्या सर्वेनुसार ३२% अपघात हे प्राण्यांमुळे होत आहे. असाही अहवाल पुढे येत आहे. त्यांचे सर्वेक्षण पुढे येणार आहे, अशी माहिती सास रोड सेफ्टी अभियानचे अध्यक्ष श्याम सवाई यांनी दिली.

# जंगला लगतच्या गावांमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त विशेष जनजागृती......

## काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य व साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाचा पुढाकार...

### वाघ, अस्वल, बिबट च्या मुखवट्यांनी वेधले लक्ष

**प्रमोद सावळे**
**/मंगरुळपीर (ता. प्र.)**

------------------------------

वाशिम-अकोला जिल्ह्यात पसरलेले असलेल्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे १ ऑक्टोबर पासुन मोठ्या उत्साहात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या मध्ये विविध कार्यक्रमांची रेलचेल आहे. आज दि. ५ ऑक्टोबर ला जंगला लगतच्या गावांमध्ये काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य वन्यजीव विभाग अकोला व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा यांच्या संयुक्त विद्यमाने पथनाट्याच्या माध्यमातून आगळीवेगळी जनजागृती केली. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी



चेहर्यावर वाघ, अस्वल, बिबट चे मुखवटे रंगवून त्यांच्या रक्षणासोबतच संवर्धनाचा संदेश दिला. हे मुखवटे सर्व गावकर्यांना आकर्षित करत होते. या पथनाट्याच्या माध्यमातून वन्यजीव सप्ताह का साजरा केला जातो, वन्यप्राण्यांकडुन मानवावर, पाळीव जनावरे यांच्या वर होणारे हल्ले व त्याची मिळणारी नुकसान भरपाई, शेतपीकाचे होणारे नुकसान व भरपाई, वन विभागाच्या संयुक्त वनव्यवस्थापन समिती, श्यामाप्रसाद मुखर्जी जनवनयोजना अश्या विविध योजना, वन विभागाचा १९२६ हा टोल फ्री क्रमांक, वन अधिकारी, कर्मचारी यांची निसर्ग संवर्धनात असलेली भुमिका, अवैध वृक्षतोड चराईबंदी, कुर्हाडबंदी, अवैध शिकार,वनवनवा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानव-वन्यजीव संघर्ष या विषयावर माहिती देऊन उत्कृष्ट असे पथनाट्य जंगला जवळच्या भुर, कासमार येथे सादर करून विशेष व आगळीवेगळी जनजागृती करण्यात आली. यावेळी पर्यावरण, निसर्ग रक्षणासोबतच संवर्धनासाठी सर्वांनी पुढे येऊन हातभार लावावा असे आवाहन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले.काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली हा आगळावेगळा उपक्रम वन्यजीव सप्ताहानिमित्त राबविण्यात आला. यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनरक्षक अविनाश वानखडे, निलेश खोडके, करवाळे यांच्या सह रवी बेटकर, रामा लोनकर, प्रमोद खुले, प्रविण तपसी,नागसेन आकोडे आदि कर्मचारी व विध्यार्थी विलास नवघरे, सम्यक अवचार, चंदन नवघरे, नयन राठोड, आकाश सावरे आदित्य इंगोले यांची उपस्थित होती.

लोकमत

# अखेर 'त्या' पिल्लांना मादी बिबटने सोबत नेले

## वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रयत्न यशस्वी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मंगरूळपीर** : तालुक्यातील कोळंबीच्या जंगल परिसरात २३ एप्रिल रोजी बिबटची दोन पिल्ले आढळून आली. तेव्हापासून त्याठिकाणी वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तळ ठोकून पिलांना त्यांची आई केव्हा घेऊन जाते, यावर पाळत ठेवली. यादरम्यान त्याचदिवशी रात्रीच्या सुमारास मादी बिबटने येऊन दोन्ही पिल्लांना सोबत नेले आणि पिल्लांचे आईशी मनोमिलन झाल्याने वनविभागाच्या चमूनेही आनंद व्यक्त केला.

२३ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास बिबटची पिल्ले आढळल्यानंतर त्यांना पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. वनविभागाच्या चमूनेही तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन मादी बिबटचा शोध घेतला. मात्र, ती कुठेही आढळली नाही. वनविभागाचे उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, सहायक वनसंरक्षक विपूल राठोड यांनीदेखील घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. सोबतच कारंजा-मंगरूळपीर वनपरिक्षेत्राचे अधिकारी अमित शिंदे यांनीदेखील चमूसोबत घटनास्थळी जाऊन नागरिकांना प्रवेशबंदी केली.

दरम्यान, मादी बिबटचा शोध घेण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले. यावेळी रात्रीच्या सुमारास आई आणि पिल्लांचे मिलन झाले. मादी बिबटने दोन्ही पिल्लांना उचलून घेत दुसऱ्या ठिकाणी हलविले. २४ एप्रिल रोजी सकाळी वनविभागाने ड्रोनद्वारे पाहणी केली. बिबटच्या पायांचे ठसेदेखील घेण्यात आले.



### नागरिकांनी खबरदारी बाळगावी

वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी या भागात ड्रोन ट्रॅप कॅमेऱ्याने नजर ठेवून आहेत. नागरिकांनी सध्या जंगलात जाऊ नये. शेतातील कामे एकट्याने न करता समूहाने करावे, हातात काठी किंवा गाणी वाजणारे रेडिओ वापरावे, बिबट आढळून आल्यास तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले.

# विहिरीत पडलेल्या कोल्ह्याला जीवदान वनविभाग व रासेयो पथकाची तत्परता...

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**वाशिम, ता. १७ :** अन्न व पाण्याच्या शोधात भटकंती करीत असताना विहिरीचा अंदाज न आल्याने वनोजा येथील वासुदेव राऊत यांच्या शेतातील ३५ फुट खोल विहिरीत दोन दिवसांपूर्वी एक कोल्हा पडला होता. आज राऊत शेतात गेले असता त्यांना विहिरीत कोल्हा आढळून आला. सदर घटनेची माहिती त्यांनी वनोजा येथील श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती म व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांना दिली. माहिती वरून पथकाचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. सदर घटनेची माहिती वनरक्षक गणेश जामकर यांना दिली. यानंतर जामकर व पथकाचे सदस्य प्रविण गावंडे, नयन राठोड व ज्ञानेश्वर खडसे यांनी दिड तासाच्या अथक प्रयत्नानंतर सदर कोल्ह्याला विहिरी बाहेर काढत जीवदान दिले.



# अपघातातील जखमी महिलेला पेपरला न जाता रासेयो पथकाच्या सदस्याने दिला मदतीचा हात



**मंगरूळपीर ।** वाशिम ते शेलुबाजार रोडवरील पिंप्री खुर्द फाट्या नजीक अज्ञात वाहनाच्या धडकेत एक म हिला जखमी झालेली होती. अशी माहिती पथकाचे सहकारी सत्यम अवगण यांनी श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य राहुल साखरे यांना दिली. माहिती मिळताच पथकाचे सदस्य राहुल साखरे यांनी पेपरला न जाता सहकार्या सोबत तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी सदर अपघात हा रात्री झालेला होता अशी माहिती मि ळाली; या अपघातात त्या महिलेच्या उजव्या हाताला जखम होती व संपूर्ण शरीराला मुक्का मार लागलेला होता. ही सर्व माहिती राहुल साखरे यांनी ११२ ला देऊन १०८ ला पाचारण केले. परंतु १०८ ला येण्यास विलंब होत होता व कोणतेही खाजगी वाहन मदतीकरिता थांबत नव्हते या वेळी रुग्णसेवा युवा ग्रुप चे अध्यक्ष शिवा सावके यांनी पथकाच्या माहीती वरून जखमींच्या मदतिकरिता ज्ञानेश्वर सुर्वे (पिंपरी,सुर्वे) यांचे खाजगी वाहन उपलब्ध करून दिले. त्यानंतर जखमी महिलेला उपचाराकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र शेलुबाजार येथे आणले प्रथमोपचार करून पुढील उपचाराकरिता १०८ च्या साहाय्याने वाशिम येथे हलविण्यात आले. तेव्हा त्या महीले सोबत कोणीही न्हवते तर पथकाचे सदस्य प्रथम सींकटवार, नयन राठोड हे त्या महिले सोबत गेले या वेळी पोलिस चौकी शेलुबाजार येथील पोलीस शिपाई गोपाल कव्हर पथकाचे सदस्य राहुल साखरे , पथकाचे सहकारी गोपाल कुटे, गोपाल लांभाडे , विशाल राऊत यांनी मदत केली.

# काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यामध्ये व्याघ्रदिन

**मंगरूळपीर, ता. २९ :** काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे जागतिक व्याघ्रदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना निसर्ग संवर्धनाचे धडे देण्यात आले.

कृषी महाविद्यालय आमखेडा व काटेपूर्णा वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक व्याघ्र दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी नेचर ट्रेल व व्याघ्र संवर्धन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथील मार्गदर्शक नागसेन आकोडे व दत्ता शेलकर यांनी विद्यार्थ्यांना निसर्गाबद्दल विस्तृत माहिती दिली.

यानंतर व्याघ्र संवर्धन कार्यशाळेत अभयारण्याचे वनपाल तुपकर तसेच वनरक्षक प्रविण कांबळे, वनरक्षक अमोल पोटे, वनरक्षक पौर्णिमा यादव यासोबतच कृषी महाविद्यालय आमखेडा येथील प्रा. नंदकिशोर काळे, प्रा. स्नेहा अटळकर यांची उपस्थित होते. यावेळी वनपाल तुपकर यांनी व्याघ्र दिनाची पार्श्वभूमी व साजरा करण्याचे महत्त्व विशद केले.



**मंगरुळपीर : जागतिक व्याघ्रदिन साजरा करताना निसर्गप्रेमी.**

अन्नसाखळीत वाघांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. जंगलात वाघाचे अस्तित्व हे समृद्ध जैवविविधतेचे प्रतिक आहे, असे ते म्हणाले. वन्यजीवरक्षक आदित्य इंगोले यांनी देखील वाघांचा अधिवास,अवैध शिकार, वृक्षतोड व मानव-वन्यजीव संघर्ष याविषयांवर प्रकाश टाकला. वाघांचे रक्षण व संवर्धनासोबतच तृणभक्षी प्राणी व गवत याचे देखील संरक्षण करण्याची गरज आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

यासोबतच वनरक्षक कांबळे, पोटे, यादव यांनी देखील व्याघ्र संवर्धनावर आपले मत व्यक्त केले. वनरक्षक पोटे यांनी व्याघ्र रक्षणात येणाऱ्या अडचणी कथन केल्या. वनरक्षक पौर्णिमा यादव यांनी परिसंस्थेबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांना व सर्व उपस्थितांनी पर्यावरण प्रतिज्ञा देखील घेतली. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वन कर्मचारी विकास आकोडे, सुमित भगत, प्रेम खंडारे, अक्षय डाखोरे, शिलवान प्रधान, राजेश शेळके, सचिन शेळके, गजानन बेटकर, अजय राठोड, प्रमोद खुळे, नयन राठोड, ज्ञानेश्वर खडसे व आदित्य इंगोले यांनी परिश्रम घेतले.

देशोन्नती

# स्वयंसेवकांचा अमरावती विद्यापीठ येथे गौरव

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वनोजा** ■ सत्र २०२२-२३ मध्ये युवा व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सहासी शिबिर मनाली येथे पार पडलेल्या शिबिरामध्ये प्राविण्य मिळवलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदित्य पुरुषोत्तम इंगोले व प्रविण वामन गावंडे, सालुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा ता. मंगरूळपीर जि.वाशिम यांना राष्ट्रीय स्तरावरील



प्रमाणपत्र डॉ. राजेश बुरंगे संचालक राष्ट्रीय सेवा योजना यांच्या हस्ते देऊन त्याचा गौरव करण्यात आला.

हे राष्ट्रीय स्तरावरील साहसी शिबिर अटल बिहारी वाजपेयी माऊंटनिंग अॅन्ड अलाईड स्पोर्ट्स इस्टिट्यूट मनाली,हिमाचल प्रदेश येथे पार पडले होते. या शिबिरामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथील ६ राष्ट्रीय सेवा योजना चे स्वयंसेवक रासेयो संचालक मा. श्री. डॉ. राजेश बुरंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी होऊन महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले होते.या शिबिरात या स्वयसेवकांनी दैदिप्यमान कामगीरी करीत महाराष्ट्र व विद्यापीठाचे नाव उंचावले.१० दिवस चाललेल्या या साहसी शिबिरामध्ये सर्वच साहसी प्रकारात भाग घेऊन विशेष प्राविण्य प्राप्त केले.यामध्ये ट्रेकिंग,रिवर क्रॉसींग, रॉक क्लायबिंग,रॅपलिंग, कॅम्पिंग,माऊंटन रेस्क्यू पध्दती या सर्वच प्रकारात या स्वयंसेवकांनी हिरीरीने सहभागी होऊन विशेष प्राविण्य प्राप्त केले.यामुळेच विद्यापीठ तसेच महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना चे संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी आदित्य इंगोले व प्रविण गावंडे यांच्या कामगिरी बद्दल प्रशस्तीपत्र तसेच सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या गौरवाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.देवेंद्र गावंडे तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी कौतुक केले. (वार्ता.)

Deshonnati Edition
Aug 14, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

लोकमत

# वाहन उलटून चार जण जखमी!

## पेडगावनजीकची घटना : सुदैवाने जीवितहानी टळली

मंगरूळपीर : अज्ञात वाहनाने ओव्हरटेक केल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून दुसरे वाहन उलटले. या अपघातात चौघेजण जखमी झाले. ही घटना नागपूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील पेडगावनजीक १९ मार्चला दुपारी चारच्या सुमारास घडली.

प्राप्त माहितीनुसार एमएच २८, बी-२६६० क्रमांकाचे महिंद्रा पिकअप हे वाहन बुलढाण्याकडून कारंजाकडे जात होते. पेडगावनजीक या वाहनामागून येत असलेल्या अज्ञात वाहनचालकाने चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक केल्याने महिंद्रा पिकअपच्या चालकाचे नियंत्रण सुटून हे वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. यात वाहनांतील सहापैकी चौघेजण जखमी झाले. जखमींमध्ये महिला, पुरुषासोबतच एका लहान मुलीचा समावेश आहे.



### रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाने केली मदत

अपघाताची माहिती मिळताच वनोजा येथील साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य बुद्धभूषण सुर्वे व अनिकेत डुंगळे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना तत्काळ बाहेर काढून १०८ रुग्णवाहिकेला पाचारण केले. मात्र रुग्णवाहिकेला विलंब होत असल्याने शेलूबाजार येथील सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कोठाळे यांच्या वाहनाने जखमींना शेलूबाजार प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. तेथून पुढील उपचारासाठी जखमीला अकोला येथे हलविण्यात आले.

Hello Washim
Page No. 3 Mar 20, 2023
Powered by: erelego.com

दिव्य मराठी
यवतमाळ 23-03-2023

# वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा : पवन जाधव

## काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात जागतिक वन दिवस उत्साहात; विद्यार्थिनींचा सहभाग

**प्रतिनिधी** | मंगरूळपीर

वाशीम अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे जागतिक वन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य व साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा राष्ट्रीय सेवा योजना च्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वनाधिकारी अनिल निमजे सर तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मंगरूळपीर येथील प्रा. डॉ. संजीव इंगळे, वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधल वनपाल तुपकर यांची उपस्थिती होती.

यावेळी यशंवतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळपीर येथील विद्यार्थींना यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यामध्ये निसर्ग पाऊल वाट ने वन भ्रमंती चे आयोजन करण्यात आले होते. तसेच अभयारण्य कडुन विद्यार्थींना बस व्दारे जंगल सफारी चे देखील आयोजन करण्यात आले होते. यावेळी वनरक्षक नीलेश खोडके व त्यांच्या चमूने विद्यार्थींना अभयारण्याबाबत तसेच पक्षी, किटक, वृक्ष, वन्यजीव याबद्दल वन भ्रमंती व जंगल सफारी च्या माध्यमातून सर्व माहिती दिली. यानंतर अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वनाधिकारी निमजे यांनी उपस्थितांना जागतिक वन दिनी जंगला बद्दल व वनांबद्दल विस्तृत अशी माहिती देऊन पर्यावरण संवर्धनासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.



जागतिक वन दिवस कार्यक्रमात सहभागी विद्यार्थिनी, शिक्षक व 'काटेपूर्णा'चे अधिकारी, कर्मचारी.

लोकमत

# प्रादेशिक जंगलाला आग

लोकमत न्यूज नेटवर्क

**वनोजा :** मंगरुळपीर तालुक्यातील आदर्श ग्राम वनोजा येथून जवळच असलेल्या अकोला-मंगरुळपीर मार्गालगतच्या प्रादेशिक जंगलाला २३ जानेवारीला दुपारी ३ वाजताच्या सुमारास लागलेल्या आगीत काही झाडे जळून खाक झाली. अर्ध्या तासातच वनविभाग व रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाने आगीवर नियंत्रण मिळविल्याने पुढील अनर्थ टळला.

प्रादेशिक जंगलाला दुपारी ३ वाजताच्या सुमारास आग लागल्याचे लक्षात येताच, श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांनी तातडीने घटनास्थळ गाठले. या घटनेची माहिती वनविभागाला दिली. तोपर्यंत झाडांच्या फांद्यांच्या साहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, हवेचा जोर अधिक असल्याने आग विझविण्यासाठी अडथळे आले होते. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनरक्षक नीलेश खोडके आपल्या कर्मचारी व फायर कन्ट्रोल वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. अवघ्या अर्ध्या तासात आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य व वनविभागाचे कर्मचारी यांच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविले

Hello Washim
Page No. 1 Jan 24, 2023
Powered by: erelego.com

देशोन्नती

# रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचा पालकमंत्र्याच्या हस्ते सन्मान



**शेलूबाजार** ▪ वाशिम येथील नियोजन भवनात जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचा पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

वाशिम जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे, रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे व रासेयो पथकाचे समन्वयक प्रा. बापुराव डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या ३ वर्षापासून वाशिम जिल्ह्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व अपघातात्मक घडलेल्या आपत्तीच्या काळात जसे कि, वाहून गेलेले मृतदेह बाहेर काढणे, पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करणे, आगी विझविणे, सिलेंडर स्फोट, मानवी अधिवासातील सापांना व जखमी वन्यजीवांना वाचविणे, रस्तृ अपघातातील जखमींना मदत करणे या सारख्या अनेक प्रकारच्या आपत्ती च्या काळात तत्परतेने पथकाचे सदस्य धावून जातात याचाच सन्मान म्हणून, आज वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. संजय राठोड यांच्या हस्ते गौरव पत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. यावेळी वाशिम जिल्ह्याचे जिल्हाधिकारी षमुखराजन एस, जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी वसुमना पंत,अप्पर पोलिस अधिक्षक गोरख भामरे, आमदार राजेंद्र पाटणी, शिक्षक आमदार किरणराव सरनाईक निवासी उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांची उपस्थिती होती.हा सन्मान पथकाचे समन्वयक प्रा.बापुराव डोंगरे यांच्या सदस्यांसोबत स्विकारला. यावेळी वाशिम जिल्ह्यातील असंख्य नागरिकांची उपस्थिती होती.(वार्ता)

Deshonnati Edition
Oct 23, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन पथकसन्मानित



**मंगरूळपीर ।** येथे नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचा गौरवपत्र तसेच सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

जिल्हाधिकारी मा. शैलेश हिंगे, रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या ३ वर्षापासून वाशिम जिल्ह्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती च्या काळात जसे कि, वाहुन गेलेले मृतदेह बाहेर काढणे, पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करणे, आगी विझविणे, सिलेंडर स्फोट, मानवी अधिवासातील सापांना व जखमी वन्यजीवांना वाचविणे, रस्त् अपघातातील जखमींना मदत करणे या सारख्या अनेक प्रकारच्या आपत्ती च्या काळात तत्तपरतेने पथकाचे सदस्य मदतीसाठी धावून जातात. याचाच सन्मान म्हणून, आज वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. संजय राठोड यांच्या हस्ते गौरवपत्र व सन्मानचिन्ह देऊन पथकाला गौरवण्यात आले.यावेळी वाशिम जिल्ह्याचे जिल्हाधिकारी शण्मुगराजन एस, जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी वसुमना पंत,अप्पर पोलिस अधिक्षक गोरख भामरे, कारंजा-मानोरा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र पाटणी, शिक्षक आमदार किरणराव सरनाईक निवासी उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहु भगत यांची उपस्थिती होती.

लोकमत

# समृद्धीवर आणखी अपघात; तीन जणांसह नीलगाय जखमी!

## अपघातांची मालिका थांबेना : वन्यप्राण्यांचा रस्त्यावर संचार



लोकमत न्यूज नेटवर्क

**मंगरूळपीर** : समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. शुक्रवारी सकाळी या मार्गावर आणखी एक अपघात घडला. यात अचानक रस्त्यावर आलेल्या नीलगाईला वाहन धडकल्याने तिघांसह नीलगाय जखमी झाली. ही घटना मंगरूळपीर तालुक्यातील पांगरी महादेव या गावानजीक घडली.

वन्यप्राण्यांना आणि त्यांच्यापासून वाहनांनाही धोका नको म्हणून समृद्धी महामार्गावर ९ ठिकाणी ओव्हरपास व १७ ठिकाणी अंडरपास आहेत. मात्र, उर्वरित ठिकाणी रस्त्याच्या कडेला कुंपण केलेले आहे. यानंतरही कुंपणातून वन्यप्राणी समृद्धी महामार्गावर प्रवेश करत आहेत. अशात शुक्रवारी २ वाजताच्या सुमारास रस्त्यावर आलेल्या नीलगाईला वाहनाची धडक बसली. या अपघातात वाहनातील तिघे जखमी झाले, तर नीलगायही गंभीर जखमी झाली. तीनही जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पाठविण्यात आले; परंतु या अपघातात दोन पायांना गंभीर दुखापत होऊन एक शिंग तुटलेली नीलगाय तब्बल आठ तास समृद्धी महामार्गावर जखमी अवस्थेत विव्हळत होती. वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी रात्री घटनास्थळी आले, परंतु हताश होऊन परत गेले. समृद्धी महामार्गावर वन्यप्राणी येऊ नयेत, तसेच अपघातातील जखमी वन्यप्राण्यांवर तत्काळ उपचार व्हावेत, यासाठी उपाययोजना करण्याची मागणी वन्यप्रेमी करत आहेत.

Hello Washim
Page No. 3 May 27, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

जागतिक व्याघ्र दिनी वनविभागाची काटेपूर्णा अभयारण्यात कार्यशाळा

# 'वाघांचे संरक्षण, संवर्धन ही काळाची गरज!'

लोकमत न्यूज नेटवर्क

**वनोजा:** अकोला-वाशिम जिल्ह्यात पसरलेल्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात शनिवारी जागतिक व्याघ्र दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी नेचर ट्रेल व व्याघ्र संवर्धन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात वन अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वाघांचे अन्नसाखळीतील महत्त्व पटवून देतानाच वाघांचे संरक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले.



कृषी महाविद्यालय आमखेडा व काटेपूर्णा वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक व्याघ्र दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी नेचर ट्रेल व व्याघ्र संवर्धन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यातील मार्गदर्शक नागसेन आकोडे व दत्ता शेलकर यांनी विद्यार्थ्यांना निसर्गाबद्दल विस्तृत माहिती दिली. व्याघ्र संवर्धन कार्यशाळेत अभयारण्याचे वनपाल तुपकर तसेच वनरक्षक प्रवीण कांबळे, वनरक्षक अमोल पोटे, वनरक्षक पौर्णिमा यादव, कृषी महाविद्यालय आमखेडा येथील प्रा. नंदकिशोर काळे, प्रा. स्नेहा अटळकर यांची उपस्थिती होती. वनपाल तुपकर यांनी व्याघ्र दिनाची पार्श्वभूमी व हा दिवस साजरा करण्याचे महत्त्व विशद केले. अन्नसाखळीत वाघांचे असलेले महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. वन्यजीव रक्षक आदित्य इंगोले यांनीही वाघांचा अधिवास, अवैध शिकार, वृक्षतोड व मानव-वन्यजीव संघर्ष या विषयांवर प्रकाश टाकला. वनरक्षक कांबळे, पोटे, यादव यांनीही व्याघ्र संवर्धनावर आपले मत व्यक्त केले. वनरक्षक पोटे यांनी व्याघ्र रक्षणात येणाऱ्या अडचणींचे अनुभवातून कथन केले. वनरक्षक पौर्णिमा यादव यांनी परिसंस्थेबद्दल मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी व सर्व उपस्थितांनी पर्यावरण प्रतिज्ञा घेतली. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनकर्मचारी विकास आकोडे, सुमित भगत, प्रेम खंडारे, अक्षय डोखोरे, शीलवान प्रधान, राजेश शेळके, सचिन शेळके, गजानन बेटकर, अजय राठोड, प्रमोद खुळे, नयन राठोड, ज्ञानेश्वर खडसे व आदित्य इंगोले यांनी परिश्रम घेतले.

Hello Washim
Page No. 3 Jul 30, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# रासेयो स्वयंसेवकांची राष्ट्रीय साहसी शिबिरात चमक

**वनोजा :** मनाली येथे २०२२-२३ च्या सत्रात पार पडलेल्या राष्ट्रीय साहसी शिबिरात वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदित्य पुरुषोत्तम इंगोले व प्रवीण वामन गावंडे यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत राज्यासह अमरावती विद्यापीठाचे नाव उंचावले. याबद्दल त्यांना गुरुवारी राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र देऊन विद्यापीठाकडून सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील साहसी शिबिर अटलबिहारी वाजपेयी माऊंटनिंग अँन्ड अलाईड स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट मनाली, हिमाचल प्रदेश येथे पार पडले होते. यात अमरावती विद्यापीठातील ६ रासेयो स्वयंसेवकांनी रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. यात प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनात आदित्य इंगोले आणि प्रवीण गावंडे यांनी देदीप्यमान कामगिरी करीत विद्यापीठाचे नाव उंचावले. याबद्दल दोघांचाही अमरावती विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

लोकमत

# रासेयो स्वयंसेवकांची राष्ट्रीय साहसी शिबिरात चमक

**वनोजा :** मनाली येथे २०२२-२३ च्या सत्रात पार पडलेल्या राष्ट्रीय साहसी शिबिरात वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदित्य पुरुषोत्तम इंगोले व प्रवीण वामन गावंडे यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत राज्यासह अमरावती विद्यापीठाचे नाव उंचावले. याबद्दल त्यांना गुरुवारी राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र देऊन विद्यापीठाकडून सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील साहसी शिबिर अटलबिहारी वाजपेयी माऊंटनिंग अॅन्ड अलाईड स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट मनाली, हिमाचल प्रदेश येथे पार पडले होते. यात अमरावती विद्यापीठातील ६ रासेयो स्वयंसेवकांनी रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. यात प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनात आदित्य इंगोले आणि प्रवीण गावंडे यांनी देदीप्यमान कामगिरी करीत विद्यापीठाचे नाव उंचावले. याबद्दल दोघांचाही अमरावती विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सकाळ

# समृद्धी महामार्गावर चारचाकीची नीलगाईला धडक; तीन जखमी

**सकाळ वृत्तसेवा**

मंगरूळपीर ता.२६ : हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर एम. एच. ४८ ए. के. ४३४० या क्रमांकाच्या चारचाकी गाडीने नागपूरकडून संभाजीनगरकडे जाताना गुरुवारी मध्यरात्री २ च्या सुमारास वाशीम जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्यामध्ये महामार्गावर एका नीलगाईला धडक दिली. यामध्ये चारचाकी गाडीतील तीन जण गंभीर जखमी झाले. तसेच नीलगायच्या दोन पायांना गंभीर दुखापत झाली व एक शिंग तुटले.

अपघातामधील जखमी रुग्णांना महामार्गावरील यंत्रणेने तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल केले. मात्र, नीलगाय रात्रीपासून समृद्धी महामार्गावर जखमी अवस्थेत विव्हळत होती. वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी व साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाचे आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य रात्री घटनास्थळी दाखल झाले. परंतु जखमी नीलगाईला उपचारासाठी नेण्यासाठी सकाळी नऊ वाजेपर्यंत सुविधा उपलब्ध झाली नाही. सकाळी नऊ वाजता क्रेनच्या सहाय्याने नीलगायला उचलून ट्रकमध्ये कारंजा येथील वन पर्यटन केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले.



जखमी नीलगाय.

स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा वाशीम जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्यामधून गेला आहे. अभयारण्यातील वन्यप्राण्यांना धोका नको म्हणून अभयारण्यामधून जाणाऱ्या महामार्गावर रस्त्याच्या कडेला संरक्षण भिंत उभारली आहे. मात्र अनेक ठिकाणी या संरक्षण भिंती खुल्या आहेत. त्यामधून हे वन्य प्राणी महामार्गावर ये-जा करतात. समृद्धी महामार्गावर अपघात घडल्यास जखमींना तत्काळ रुग्णवाहिका व इतर सुविधा मिळताना दिसून येतात. मात्र, मुक्या प्राण्यांचा अपघात झाल्यास त्यांना वन विभाग किंवा रुग्णालयात दाखल करण्याची कोणतीच सुविधा नाही. समृद्धीच्या चेक पोस्टवरून मदतीसाठी आलेल्या वाहनांना प्रवेश नाकारला जातो. वन्य प्राण्यांचा अपघात घडल्यास वन विभागाकडे बोट दाखवून हात झटकले जातात. यामध्ये निरपराध वन्य प्राण्यांना प्राणास मुकावे लागत असून आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी वन्यप्रेमी करीत आहेत.

> समृद्धी महामार्गावर प्राण्यांचा अपघात होताच त्यांना प्रथमोपचार किंवा सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याकरिता यंत्रणा दिसून आली नाही. त्याचबरोबर बरेचदा असेही ऐकण्यात येते की छोट्या मोठ्या प्राण्यांचा अपघात झाला तर, त्या वन्यप्राण्यांची वरच्यावर विल्हेवाट लावली जाते. कृपया जिल्हा प्रशासनाने लक्ष घालावे. तसेच वाशीम जिल्ह्यात अपघाताची संख्या मोठी आहे. त्यात रुसो टीमच्या सर्वेनुसार ३२% अपघात हे प्राण्यांमुळे होत आहेत. असाही अहवाल पुढे येत आहे. लवकरच त्यांचे सर्वेक्षण पुढे येणार आहे.
>
> **- श्याम सवाई,** अध्यक्ष, सास रोड सेफ्टी अभियान

Akola, Akola-Today
27/05/2023 Page No. 4

पुण्य नगरी

# वनोजा जंगल परिसरात पेटला वणवा

## आगीत वनसंपदा खाक; अथक प्रयत्नाने आगीवर नियंत्रण

**मंगरूळपीर**, दि. २३ (प्रतिनिधी)



तालुक्यातील वनोजा येथील प्रादेशिक जंगलात २३ जानेवारीचे दुपारी तीन वाजता आग लागून वणवा पेटल्याची घटना घडली. आगीवर नियंत्रण मिळविण्यात बऱ्याच वेळ खर्ची झाल्याने मोठ्या प्रमाणात वनसंपना आगीत खाक झाल्याची माहिती आहे.

वनोजा प्रादेशिक वनक्षेत्रात सोमवारी दुपारी अचानक आग लागली. या घटनेची माहिती मिळताच साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा राष्ट्रीय सेवा योजना आपत्ती व्यवस्थापन पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, सदर घटनेची माहिती वनविभागाला देऊन झाडांच्या फांद्याच्या सहाय्याने आग विझविण्यास सुरूवात केली. यावेळी सोसाट्याचा वारा असल्याने आग विझविण्यासाठी अडथळे निर्माण होत होते. यानंतर काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनरक्षक निलेश खोडके हे कर्मचारी व अग्निशमन विभागसह घटनास्थळी दाखल झाले. तसेच अवघ्या साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य व वनविभागाचे कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नानंतरआगीवर नियंत्रण मिळविले.याकरिता ज्ञानेश्वर खडसे, नयन राठोड, प्रविण गावंडे, आदित्य इंगोले, काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनरक्षक निलेश खोडके व काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे कर्मचारी तसेच प्रादेशिक वनविभागाचे डाखोरे आदिंनी परिश्रम घेतले.

Smart Washim Edition
Jan 24, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com

# अजगराने गिळला मोठा रानबोका !

देशोन्नती वृत्तसंकलन...

**बनोजा** ■ आज दुपारी भुर येथील राजु भगत यांच्या शेतात एक भला मोठा साप त्यांना दिसुन आला. यावेळी सदर घटनेची माहिती त्यांनी बनोजा सर्पमित्र तसेच वन्यजीव रक्षक व साळुंकाबाई राऊत महाविद्यालय बनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य आदित्य इंगोले यांना दिली.



माहितीवरून आपले सहकारी नयन राठोड व ज्ञानेश्वर खडसे यांच्या सोबत घटनास्थळी दाखल झाले. यानंतर सदर ठिकाणी पाहणी केली असता, तो अंदाजे ७-८ फुट लांबीचा अजगर होता.तसेच या अजगराचे एक मोठा रानबोका देखील गिळंकृत केला होता. यावेळी अजगराला मोठ्या शिताफीने पकडुन सदर घटनेची माहिती वनविभागाला दिली. सदर अजगराला पाहण्यासाठी शेतकर्यांनी गर्दी केली होती. एवढा मोठा साप शेतात आढळल्याने आजुबाजूच्या शेतकरी बांधवांन मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.यानंतर आदित्य व त्यांचे सहकारी यांनी उपस्थितांना अजगर सापाबद्दल विस्तृत माहिती दिली. सदर साप हा शेतकऱ्यांचा खरा मित्र आहे असे प्रतिपादन केले. कारण शेतीचे नुकसान करणारे तृणभक्षी जसे कि, हरिण, रानडुक्कर, नीलगाय यांच्या छोट्या पिल्लांना तो आपले भक्ष बनवतो व अन्नसाखळी अबाधित ठेवण्याचे कार्य करतो.

सदर सापाला वन्यजीव अधिनियम १९७२ अंतर्गत संरक्षण दिले आहे. यामुळे साप आढळून आल्यास न मारता सर्पमित्राला पाचारण करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यानंतर मंगरूळपीर वनक्षेत्राचे वनपाल सोनोने यांच्या उपस्थितीत रितसर पंचनामा करून सदर अजगराला काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यामध्ये सोडत जीवदान दिले. (वार्ता.)

# रासेयोच्या निसर्ग प्रेमींनी केले मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वनोजा** ■ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा येथील एनसीसी च्या विद्यार्थ्यांची आज काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे वन भ्रमंती आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य आदित्य इंगोले, सचिन राठोड यांनी विद्यार्थ्यांना निर्सगा बद्दल पर्यावरणाबद्दल इस्तंभुत माहिती दिली.

११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अकोला, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे व काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य चे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या वन भ्रमंती चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचा आदित्य इंगोले व वनविभागाचे गाईड दत्ता शेलकर यांनी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट च्या विद्यार्थांना काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य तसेच विविध फुलपाखरे, कोळी, वृक्ष, आयुर्वेदिक औषधी वनस्पती, वन्यजीव पक्षी यांच्या बद्दल विस्तृत माहिती देऊन त्यांचे निसर्गात असलेले महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विद्यार्थांना विविध फुलपाखरांच्या जाती, पक्षी, वन्यजीव, वनौषधी यांच्या ओळख होऊन त्याबद्दल माहिती मिळाली. यावेळी विद्यार्थांना विविध पक्षी, फुलपाखरे, कोळी, वन्यजीव यांचे दर्शन देखील झाले. यावेळी निसर्ग सृष्टी अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन निसर्ग रक्षणासोबतच संवर्धनात हातभार लावावा असे आवाहन निसर्ग प्रेमींनी केले. एनसीसी कॅडेटनी त्यांच्या मनात असलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. यावेळी सचिन राणे, सचिन राठोड यांनी देखील विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला लेफ्टनंट डॉ.सुनिल बोरचाटे,वनरक्षक निलेश खोडके, रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे प्रथम सिंकटवार,नयन राठोड, वनविभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी एनसीसी चे ३५ कॅडेट नी या वन भ्रमंती मध्ये सहभाग नोंदवला होता.(वार्ता.)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला जखमी



**मंगरुळपीर :** तालुक्यातील वाशीम ते शेलुबाजार मार्गावरील पिंप्री खुर्द फाट्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एक महिला जखमी झाल्याची घटना ११ रोजी घडली.

प्राप्त माहितीनुसार, पिंप्री खुर्द फाट्याजवळ अपघातग्रसत वृध्द महिला पडून असल्याची माहिति बचाव पथकाचे सत्यम अवगन यांनी श्रीमती साळूंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकास दिली. त्यानुसार बचाव पथकाचे राहूल साखरे यांनी परिक्षेला न जाता सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी रुग्णसेवा ग्रुपचे अध्यक्ष शिवा सावके यांनी जखमीच्या मदतीकरीता ज्ञानेश्वर सुर्वे यांचे खासगी वाहन उपलब्ध करुन दिले. यानंतर अपघातग्रस्त महिलेलवर शेलुबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. याठिकाणी प्रथमोपचार करुन प्रथम सिंकटवार, नयन राठोड हे महिलेला १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेने पुढील उपचारासाठी वाशीम येथे घेवून गेले. जखमी महिलेला उपचारासाठी नेण्याकरीता शेलुबाजार पोलीस चौकी कर्मचारी गोपाल कव्हर, राहूल साखरे, गोपाल कुटे, गोपाल लांभाडे, विशाल राऊत यांनी सहकार्य केले.

लोकमत

# सात किलोमीटर अंतर मोहीम राबवून शोधला वृद्धाचा मृतदेह

## वनोजातील राऊत महाविद्यालयाच्या रासेयो पथकाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : रिसोड तालुक्यातील हिवरा पेन येथे पैनगंगा नदीत सीताराम बाबुराव सरनाईक (वय अंदाजे ८० वर्षे) हे वृद्ध वाहून गेल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांनी बुधवारी पाच तास सात किलामीटर अंतरात शोधमोहीम राबवून त्यांचा मृतदेह बाहेर काढला.

हिवरा पेन येथील नदीत सीताराम सरनाईक हे वाहून गेल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन



अधिकारी शाहू भगत तसेच रिसोडचे तहसीलदार अजित शेलार यांनी वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो पथकाचे समन्वयक प्रा. बापुराव डोंगरे यांना दिली.

प्रा. डोंगरे यांनी पथकाच्या सदस्यांना हिवरा पेन येथे सकाळीच रवाना केले त्यानंतर पथकाने पाच तास सर्च ऑपरेशन राबविले. त्यात घटनास्थळापासून ७ किमी अंतरावर सीताराम नाईक यांचा मृतदेह एका खडकावर नदीमध्ये आढळून आला.

पथकाचे प्रवीण गावंडे, ज्ञानेश्वर खडसे, सुमित राठोड, पुनेश राठोड, अनिकेत इंगळे, अभिषेक ठाकरे, नामदेव डाळ, विलास नवघरे, चंदन गव्हाने, गणेश शिंदे (चालक) व रोशन लांभाडे आदी सदस्यांच्या मदतीने सर्च ऑपरेशन राबविण्यात आले.

यावेळी तहसीलदार, मंडल अधिकारी, तलाठी दीपक गोटे उपस्थित होते

# दुचाकीची समोरासमोर धडक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मंगरूळपीर** ■ अकोला-मंगरूळपीर महामार्गावरील वनोजा फाट्यावर दोन दुचाकींची समोरासमोर जबर धडक झाली. यामध्ये दोन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. श्प् ३७ ०६११ व श्प् ३७ ७१४० या दोन दुचाकी ची समोरासमोर धडक झाली. यामध्ये येडशी येथील मोबी पवार वय ५५ वर्ष यासोबतच तानाजी खनागळी ( करमाळा ता.जि.सोलापूर व सुनिल जाधव सोंडा ता. वाशिम) हे ३ जण जखमी झाले. यावेळी जखमींना हाताला व डोक्याला तसेच पाठीला गंभीर दुखापत झाली.व जास्त रक्तस्राव देखील भरपूर झाला.सदर घटनेची माहिती वनोजा येथील स्थानिकांना मिळताच ते तत्काळ मदतीसाठी धावले. तसेच साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो च्या आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांना पाचारण केले. सदर घटनेची माहिती ११२ ला देऊन तत्काळ १०८ रुग्णवाहिके ला पाचारण केले. व क्षणाचा हि विलंब न करता यावेळी शेलुबाजार आरोग्यवर्धिनी केंद्रतील १०८ रूग्णविहेकेचे चे चालक चंद्रकांत मुखमाले व डॉ. मिलन चव्हाण तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी स्थानिक नागरिक व पथकाच्या सदस्य व रूग्नवाहिकेचे कर्मचारी यांच्या मदतीने जखमींना रूग्नवाहिकेत उचलून तत्काळ अकोला येथे उपचारासाठी हलविले. (ता.प्र.)

## २ जण गंभीर व १ किरकोळ जखमी

लोकमत

# अपघातात युवक गंभीर जखमी

**कारंजा लाड :** नागपूर-औरंगाबाद द्रुतगती महामार्गावर वाई फाट्यानजिक दुचाकी चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात होऊन युवक गंभीर जखमी झाला.

प्राप्त माहितीनुसार, सुनील वारे (२५, रा. सोहळ) हे शेलुबाजारवरून कारंजाकडे जात असताना त्यांचे वाई फाट्यानजिक वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात झाला. यात ते गंभीर जखमी झाले. माहिती मिळताच रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य अनिकेत इंगळे यांनी सहकारी अक्षय भगत व विजय भगत यांच्यासमवेत घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले.

Hello Washim
Page No. 3 Jan 24, 2023
Powered by: erelego.com

दिव्य मराठी
09-04-2023

# दुचाकींची समोरासमोर धडक; ३ जण जखमी



उपघातानंतर घटनास्थळी झालेली नागरिकांची गर्दी.

**प्रतिनिधी** | मंगरूळपीर

अकोला-मंगरूळपीर महामार्गावरील वनोजा फाट्यावर दोन दुचाकींची समोरासमोर जबर धडक झाली. यामध्ये दोन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. येडशी येथील मोबी पवार (५५), तानाजी खनागळी करमाळा जि. सोलापूर व सुनिल जाधव सोंडा हे तिघे जखमी झाले.

यावेळी जखमींना हाताला व डोक्याला तसेच पाठीला गंभीर दुखापत झाली. यावेळी जखमींना मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. सदर घटनेची माहिती वनोजा येथील स्थानिकांना मिळताच ते तत्काळ मदतीसाठी धावले. आणि सदर घटनेची माहिती ११२ ला देऊन तत्काळ १०८ रुग्णवाहिके ला पाचारण केले. यावेळी शेलुबाजार आरोग्यवर्धिनी केंद्रातील १०८ रूग्णविहेकेचे चे चालक चंद्रकांत मुखमाले व डॉ. मिलन चव्हाण तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी स्थानिक नागरिक व व साळुंखाबाई राऊत आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्य व रूग्नवाहिकेचे कर्मचारी यांच्या मदतीने



जखमींना रूग्नवाहिकेत उचलून तत्काळ अकोला येथे उपचारासाठी हलविले. अपघातानंतर जवळपास अर्धा ते एक तास रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. येथून जवळच २ मिनिटांच्या अंतरावर समृद्धी महामार्गावर वनोजा आय सी ९ टोल प्लाझावर १०८ रुग्णवाहिका उपलब्ध आहे. मात्र ती रुग्णवाहिका फक्त समृद्धी महामार्गावर अपघात झाले तरच उपलब्ध होते असे सांगितले. त्यामुळे रुग्णवाहिका उपलब्ध असून सुद्धा जखमींना लवकर मदत मिळत नाही. मदत लवकर न मिळाल्याने उपचाराअभावी जखमींचा जीव सुद्धा जाऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने रुग्णवाहिका सर्वांना उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक करत आहेत.

लोकमत

# रासेयो स्वयंसेवकांची राष्ट्रीय साहसी शिबिरात चमक

**वनोजा :** मनाली येथे २०२२-२३ च्या सत्रात पार पडलेल्या राष्ट्रीय साहसी शिबिरात वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदित्य पुरुषोत्तम इंगोले व प्रवीण वामन गावंडे यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत राज्यासह अमरावती विद्यापीठाचे नाव उंचावले. याबद्दल त्यांना गुरुवारी राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र देऊन विद्यापीठाकडून सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील साहसी शिबिर अटलबिहारी वाजपेयी माऊंटनिंग ॲन्ड अलाईड स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट मनाली, हिमाचल प्रदेश येथे पार पडले होते. यात अमरावती विद्यापीठातील ६ रासेयो स्वयंसेवकांनी रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. यात प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनात आदित्य इंगोले आणि प्रवीण गावंडे यांनी देदीप्यमान कामगिरी करीत विद्यापीठाचे नाव उंचावले. याबद्दल दोघांचाही अमरावती विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दिव्य मराठी यवतमाळ 23-03-2023

# वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा : पवन जाधव

## काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात जागतिक वन दिवस उत्साहात; विद्यार्थिनींचा सहभाग

प्रतिनिधी | मंगरूळपीर

वाशीम अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य येथे जागतिक वन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य व साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वनाधिकारी अनिल निमजे सर तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मंगरूळपीर येथील प्रा. डॉ. संजीव इंगळे, वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव वनपाल तुपकर यांची उपस्थिती होती.



जागतिक वन दिवस कार्यक्रमात सहभागी विद्यार्थिनी, शिक्षक व 'काटेपूर्णा'चे अधिकारी, कर्मचारी.

यावेळी यशंवतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळपीर येथील विद्यार्थीना यावेळी काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यामध्ये निसर्ग पाऊल वाट ने वन भ्रमंती चे आयोजन करण्यात आले होते. तसेच अभयारण्य कडुन विद्यार्थीना बस व्दारे जंगल सफारी चे देखील आयोजन करण्यात आले होते. यावेळी वनरक्षक नीलेश खोडके व त्यांच्या चमूने विद्यार्थीना अभयारण्याबाबत तसेच पक्षी, किटक, वृक्ष, वन्यजीव याबद्दल वन भ्रमंती व जंगल सफारी च्या माध्यमातून सर्व माहिती दिली. यानंतर अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वनाधिकारी निमजे यांनी उपस्थितांना जागतिक वन दिनी जंगला बद्दल व वनांबद्दल विस्तृत अशी माहिती देऊन पर्यावरण संवर्धनासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) Pin Code- 444403